CNR-No.MHLA15000085-2019

<u>फौ.कि.अर्ज क्र. १०/२०१९ मधील नि.क्र.०१ खालील आदेश</u>

(प्रशांत वि.. सचिन )

1. आज रोजी सरकारी वकील आणि आरोपीचे वकील हजर आहेत. त्यांना मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश लातूर यांचे पत्र क्र. एस.टी.बी./२४७१/२०२० दि.०५.०३.२०२० बाबत अवगत करुन देण्यात येऊन त्यांना इतर दुस–या न्यायालयात सदर प्रकरणाशी संबंधीत इतर प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत विचारणा करण्यात आली.
2. तक्रारदार व त्याचे वकील सतत गैरहजर आहेत. प्रकरण ब–याच दिवसापासून पडताळणीकरीता प्रलंबीत आहे. तक्रारदाराने दाखल केलेल्या दस्तऐवजामध्ये प्रथम माहीती अहवाल क्र. १३/२०१९ ची प्रत जोडलेली आहे. संबंधीत फौजदारी लिपीक श्री मरे यांच्याकडून माहीती मागविली असता त्यांनी प्रथम माहीती अहवाल क्र. १३/२०१९ पोलीस ठाणे चाकूरचे दोषारोपपत्र या न्यायालयात दि. २६.०६.२०१९ रोजी दाखल झालेले असून त्याचा नियमीत फौजदारी खटला क्र. ४८/२०१९ असा असून सदर प्रकरण दिवाणी न्यायाधीश चाकूर न्यायदंडधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र. १, या न्यायालयात प्रलंबीत असून त्याची पुढील तारीख २७.०४.२०२० अशी असल्याचे म्हटले. त्यावरुन सदर अर्जाशी निगडीत असलेले प्रकरण मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग चाकूर न्यायालय क्र. १ यांच्याकडे नि.फौ.ख.क्र. ४८/२०१९ हा प्रलंबीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश लातूर यांचे पत्र क्र. एस.टी.बी./२४७१/२०२० दि.०५.०३.२०२० या आदेशानुसार सर्व दिवाणी व फौजदारी प्रकरणे एकाच न्यायालयात वर्ग करण्याकरीता सह दिवाणी न्यायालय चाकूर यांच्या न्यायालयातील फौ.कि.अर्ज क्र. १०/२०१९ हे मा. दिवाणी न्यायालय चाकूर यांच्याकडे वर्ग करण्यात यावे.

Digitally signed by Yogesh Dattatray Koinkar
Date: 2020.03.16 17:45:18 +0530

स्थळ– चाकूर

दिनांक– १६/०३/२०२०

**(योगेश डी. कोईनकर)**

सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, चाकूर